महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई - ४०० ००१.

**क्रमांक : व्यशिप्र-२०२२/आस्था-२/प्र.क्र.७१/पदभरती/का-४** **दि.२४-११-२०२३**

## परिपत्रक क्र. ३८

## जाहिरात क्र.२/२०२२ च्या अनुषंगाने कनिष्ठ सर्वेक्षक नि कनिष्ठ प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक) Junior Surveyor cum Junior Apprenticeship Advisor (Technical) पदाची तात्पुरती निवड सूची (Provisional Selection List)

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अधिपत्याखालील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत राज्यातील विविध शासकीय संस्था/कार्यालयातील गट-क संवर्गातील विविध ७७२ पदे भरण्याकरिता ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्याबाबत दिनांक १६/०२/२०२३ रोजी www.dvet.gov.in या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. जाहिरातीच्या अनुषंगाने कनिष्ठ सर्वेक्षक नि कनिष्ठ प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक) Junior Surveyor cum Junior Apprenticeship Advisor (Technical) पदाकरिता अर्ज केलेल्या उमेदवारांची सामायिक परीक्षा (CBT) रविवार दिनांक १६/०४/२०२३ रोजी घेण्यात आली. सामायिक परीक्षेत (CBT) २०० गुणांपैकी किमान ४५% (९० गुण) प्राप्त केलेल्या ८५५ उमेदवारांची तात्पुरती गुणवत्ता यादी (Provisional Merit List) दिनांक ०१/०८/२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती.

**सदर तात्पुरती गुणवत्ता यादी (Provisional Merit List) अंतिम करुन कनिष्ठ सर्वेक्षक नि कनिष्ठ प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक) Junior Surveyor cum Junior Apprenticeship Advisor (Technical) पदाची ०६ उमेदवारांची तात्पुरती निवड सूची (Provisional Selection List)** दिनांक २७/१०/२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. **सदर तात्पुरत्या निवड सूचीमध्ये कोणताही बदल नाही.**

उमेदवारांच्या प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणीचे (Document Verification) वेळापत्रक स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येत आहे. प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणीअंती पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या नियुक्तीबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

तरी संबंधित सर्व उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

(दि. अं. दळवी)
संचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई-१.